**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २४.०६.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २३.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये २६ केसेसमध्ये २६ ईसमांवर कारवाई करून ९,३०,९१३/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०३ केसमध्ये ०५ ईसमांवर कारवाई करून ६,६८५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,०९९ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,४२,९००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) जुनी कामठी पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २४.०६.२०२६ चे ०२.५० वा. ते ०४.२५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जुनी कामठी येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे **अंमली पदार्थ विरोधी सप्ताह मोहीम** राबवित असतांना, पेट्रोलींग दरम्यान त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पाळत ठेवून, पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीतील बडी मस्जीद, नया बाजार परीसरात जमाल डेली निड्स दुकानसमोर एका पांढऱ्या रंगाच्या बर्गमॅन दुचाकी गाडीवरील ईसमांना थांबवुन, पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नावे १) सलमान उर्फ माया वल्द मंजुर अहमद, वय ३० वर्षे, रा. नया बाजार, नुर हाके मोहम्मद चे दवाखान्याजवळ, कामठी, नागपूर २) मोहम्मद बिलाल नागानी वल्द हनिफ नागानी, वय ३८ वर्षे, रा. बुनकर कॉलोनी, जमजम क्लीनीक जवळ, कामठी, नागपुर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन त्यांची अंगझडती घेतली असता, त्यांचे ताब्यातुन झिपलॉक पन्नीत एकुण १२.६५ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपींचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०२ मोबाईल व बर्गमॅन मोटार सायलक क्र. एम.एच. ४० डि.ए. ७४५६ असा एकुण १,३६,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे जुनी कामठी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. विजय दिघे, सपोनि. मनिष हिवरकर, पोउपनि. मिलींद मेश्राम, पोअं. विवेक दोरसेटवार, रमेश, अमित, शारीक, पवन व वाजे यांनी केली.

**३) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक १६.०६.२०२६ चे १५.३० वा. ते २२.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, प्लॉट नं. ०९, पाटील नगर, डी—ग्रुप, भिलगाव, नागपुर येथे राहणारे फिर्यादी धनंजय भिमराव नांदगाये, वय ४८ वर्षे हे त्यांचे राहते घराला कुलुप लावुन, परिवारासह लग्नवाढदिवस साजरा करण्यासाठी बाहेर गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील कपाटातुन रोख १०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण ६८,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व गोपनीय माहितीवरून आरोपी नामे अरशद खान उर्फ साहिल राशीद खान, वय २६ वर्षे, रा. ईरफान हाजी यांचे घरी किरायाने, काच कंपनी जवळ, यशोधरानगर, नागपुर यास ताब्यात घेवुन विचारपूस केली असता, त्याने वर नमुद घरफोडीचा गुन्हा त्याचा साथीदार पाहिजे आरोपी शेख आरीफ शेख साकीर, रा. बालाजी नगर, यशोधरानगर याचेसह संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन एक पिवळ्या धातूची नथ वजनी १.३४० ग्रॅम व गुन्ह्यात वापरलेली स्प्लेंडर दुचाकी क्र. एम.एच. ३१ बी.टी ४२०८ असा एकुण ६५,०००/—रू. जप्त करण्यात आला. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. डॉ. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मसपोनि. मंगला हरडे, सफौ. दिपक रिठे, पोहवा. रोशन तिवारी, नितीन वर्मा, अजय शुक्ला, किशोर सोमकुवर, पंकज हेडावू यांनी सायबर पथकाचे विशेष सहकार्याने केली.



**४) गुन्हेशाखा युनिट क्र. ०५ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या ०२ आरोपींना अटक, एकुण १० वाहन चोरी व एक घरफोडी असे ११ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १९.०६.२०२६ चे १३.०० वा. ते दिनांक २१.०६.२०२६ चे ०१.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे तहसील हद्दीत, बोरीयापुरा, नदीम क्लॉथ स्टोअर्स जवळ, तहसील, नागपुर येथे राहणारे फिर्यादी शेख राशीद शेख अजीज, वय ३८ वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून कामानिमित्य बाहेरगावी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे पहिल्या माळ्यावरील मुख्य दाराचे कुलूप तोडून आंत प्रवेश करून, कपाटामधील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,१२,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसील येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हेशाखा युनिट क्र. ०५ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपी नामे १) शहानवाज शाह वल्द गुलजार शाह, वय १९ वर्षे, रा. बोरीयापुरा, किदवाई रोड, पॉवर हाऊस जवळ, नागपुर २) फैजान खान वल्द ईनायतुल्ला खान, वय ४५ वर्षे, रा. तकीया दिवानशाह मोमीनपुरा, नागपुर तसेच, ०२ विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्यांनी संगणमताने वर नमुद घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांचे ताब्यातुन घरफोडीचे गुन्ह्यातील सोन्याचे व चांदीचे दागिने किंमती १,३६,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांना अधिक सखोल विचारपूस केली असता, त्यांनी वरील गुन्हयाव्यतीरिक्त पोलीस ठाणे धंतोली हद्दीत—०४, यशोधरानगर हद्दीत—०२, सिताबर्डी हद्दीत—०२, कपीलनगर हद्दीत—०१, कोराडी हद्दीत—०१ असे एकुण १० वाहन चोरीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. आरोपींचे ताब्यातुन एकुण १० दुचाकी वाहने किंमती अंदाजे ८,३०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींकडुन घरफोडीचा ०१ गुन्हा आणि वाहनचोरीचे १० गुन्हे असे एकुण ११ गुन्हे उघडकीस आणुन एकुण ९,६६,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपींना व विधीसंघर्षीत बालकांना मुद्देमालासह पुढील कारवाईकामी तहसिल पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. डॉ. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, सपोनि. गणेश कदम, पोहवा. राजु टाकळकर, नजीर शेख, राजुसिंग राठोड, चंद्रशेखर गौतम, प्रविण भगत, अनिस खान, राजेंद्र टाकळीकर, रूपेश नानवटकर, गणेश ठाकरे, योगेश महाजन, पोअं. विशाल नागभिडे, रोशन तांदुळकर, लिलाधर खिरडकर, सुधिर तिवारी व आशिष पवार यांनी केली.



**५) गुन्हेशाखा, युनिट क्र. ३ व ४ पथकांची संयुक्तीक कामगिरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २३.०६.२०२६ चे २२.१५ वा. ते २३.१० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा, युनिट क्र. ३ व ४ पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, हसनबाग, गल्ली नं. ४ येथे राहणरा मोहम्ममद ईरशाद याचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, नमुद ठिकाणी आरोपी क्र. १) सिराज अहमद शफीक अहमद, वय २२ वर्षे, २) मतीन शेख गफ्फार शेख, वय ३१ वर्षे, ३) गुलाम रसुल अब्दुल रहीम, वय ३३ वर्षे, ४) सलीम रफीक कुरैशी, वय ३२ वर्षे, ५) जुनैद शेख ईक्बाल शेख, वय ३१ वर्षे, ६) शेख ईमाम शेख ईस्माईल, वय ३२ वर्षे, ७) सलमान शेख नब्बु शेख, वय ३१ वर्षे, ८) शेख ईम्रान शेख सलीम, वय २६ वर्षे, ९) मोहम्मद ईरशाद मोहम्मद अस्लम, वय ३० वर्षे, सर्व रा. गल्ली नं. ४, हसनबाग, नंदनवन, नागपूर हे समक्ष ताश पत्यावर पैश्याची बाजी लावुन, हार—जीतचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख १४,१७०/—रू., वेगवेगळ्या कंपनीचे एकुण ०८ मोबाईल फोन, ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण १,६९,२२०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे नंदनवन येथे कलम ४, ५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्देमालासह नंदनवन पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास नंदनवन पोलीस करीत आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. डॉ. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर, पोनि. बाबुराव राऊत व त्यांचे पथकाने संयुक्तीकरित्या केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे जुनी कामठी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २१.०६.२०२६ चे १३.०० वा. ते दिनांक २३.०६.२०२६ चे ११.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीत, गांधी नगर, भाजी मंडी, विठ्ठल रूक्मीणी मंदीर जवळ, घर नं. एफ/४७६, नागपुर येथे राहणारे फिर्यादी अनिल यलराज करणवार, वय ६६ वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून परिवारासह नातेवाईकाकडे पुणे येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून आंत प्रवेश करून, लोखंडी आलमारीत ठेवलेले सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने एकुण किंमती अं. १,४१,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जुनी कामठी येथे पोउपनि. अक्षय सावंत ७०२०१४३७३३ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे सोनेगाव :—** दिनांक २२.०६.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सोनेगाव हद्दीत, वर्धा रोडवरील किया कार शो—रूम चे वरती भुमेश पेशने यांचे नविन ऑफीसमध्ये फिर्यादीचा मुलगा नामे विकास जागेश्वर चव्हाण, वय २४ वर्षे हा ईलेक्ट्रीक बोर्डला ड्रिलमशीन द्वारे होल करीत असतांना त्यास अचानक विजेचा धक्का लागल्याने तो बेशुध्द झाला. त्यास उपचाराकरीता आरेंज सिटी हॉस्पीटल व तेथुन मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यास २१.०५ वा. तपासून मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी जागेश्वर चव्हाण, वय ५५ वर्षे, रा. प्लॉट नं. १६३, नवकन्या नगर, भरतवाडा रोड, कळमना, नागपुर यांनी दिलेल्या बयाणावरून पोलीस ठाणे सोनेगांव येथे पोउपनि. पंडीत पवार ९६०४६२३५३४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :–** सौ. ईश्वरी उर्फ नंदीनी शिवशंकर धनवार, वय १९ वर्षे, रा. अनंत नगर, गिट्टीखदान, नागपूर ह्या दिनांक २९.०४.२०२६ चे ०८.०० वा. पासुन पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा– लांब, बांधा– मध्यम, उंची– ४ फुट १ इंच, केस– काळे लांब, अंगात– गुलाबी रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. ओळख– डाव्या हातावर इंग्रजीत एन आर असे अक्षरे गोंदलेले आहे.

**२) पोलीस ठाणे गिट्टीखदान :–** गणेश शालीकराम वानखेडे, वय ३४ वर्षे, रा. गोरोवाडा वस्ती, शितलामाता मंदीर जवळ, गिट्टीखदान, नागपूर हे दिनांक १३.०४.२०२६ चे ०८.०० वा. पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा– गोल, बांधा– मजबुत, उंची– ६ फुट, केस– काळे, अंगात– काळ्या पांढऱ्या रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. ओळख– डाव्या हातावर ''बाबुजी'' असे गोंदलेले आहे.



सौ. ईश्वरी



गणेश

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**